Vol 2 Issue 11 May 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 11, May. 2013
ISSN:-2231-5063
Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# शिक्षक शिक्षण पदविका ( डी.टी.एड.) अभ्यासक्रमातील अपंगांचे शिक्षण सद्यस्थिती– एक अभ्यास

महेश अनंतराव शिंदे , प्रतिभा सुभाषचंद्र पाटणकर

एम.फिल. संशोधक
सहाय्यक प्राध्यापिका शिक्षणशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

*सारांश:*

आपल्या भारतीय घटनेने समानतेचे तत्व स्विकारले आहे. या तत्वाने देशाच्या प्रत्येक नागरिकाला समान अधिकार आहेत. अधिकार मिळालेला असला तरी समाजातील शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक दृष्टया न्यूनता असलेल्यांना आपली प्रगती करुन घेण्यास संधीच मिळू शकली नाही. परिणामी हे सर्व घटक समानतेच्या तत्वाचा लाभ घेवू शकले नाहीत. या घटकांना घटनेनुसार लाभ द्यावेत असा सकारात्मक विचारही सर्वार्थाने केला गेला नाही. त्यांच्यासाठी तयार करण्यांत आलेल्या योजना त्यांच्यावर उपकार करीत आहोत अशा भूमिकेने राबविल्या जात असल्यामुळे केवळ आकडेवारी जमा करण्याच्या अट्टाहासामुळे या योजनांचा लाभ त्यांना मिळाला नाही. किती घटकांना प्रत्यक्षात लाभ मिळाला याचा आढावा घेतल्यास वस्तुस्थिती लक्षात येईल.

***प्रस्तावना :–***

आपल्या देशात अंध, मूकबधिर, विकलांग, मतिमंद, मनोविकृत या विविध अपंग प्रकारांची कोटयावधी माणसे मंदिर, चर्च, दर्गा व धार्मिक स्थळांसमोर भिक्षा मागताना दिसून येतात. स्वातंत्र्योत्तर काळात या अपंगासाठी अनेकविध योजना आखण्यांत आल्या. त्यावर कोटयवधी रुपये खर्च करण्यांत आले. पण या अपंगांना आम्ही उत्पादक घटक बनवू शकलो नाही. हा आत्मचिंतनाचा प्रश्न आहे. शासनाने अपंगासाठी आखलेल्या योजनांवर केलेल्या खर्चापैकी किती खर्च प्रत्यक्ष अपंगाच्या शैक्षणिक व्यवसायिक, सामाजिक पुनर्वसनासाठी झाला याचा परामर्श घेणे आवश्यक ठरते.उदाहरण द्यावयाचे म्हटले तर अपंगासाठी ' एकात्मिक शिक्षण योजना ' गेल्या अनेक वर्षापासून राबविली जात आहे. या योजनेची माहिती समाज, शासन व प्रत्यक्ष शिक्षण क्षेत्रात कार्य करणा–या किती लोकांना आहे ?हा ही अभ्यासाचा विषय ठरावा.

प्राथमिक शिक्षण हा विद्यार्थी जीवनाचा पाया आहे. या प्राथमिक शिक्षणाला योग्य आकार देणारा शिक्षक तितकाच प्रशिक्षित विविध क्षमतांनी युक्त असा असला पाहिजे. तसेच शिक्षकाला समाजात असणारे विविध प्रकारचे बालक तसेच त्याची वैशिष्टे यांची माहिती असणे गरजेचे आहे. कारण त्यातूनच उद्याच्या भारताचे नागरिक बनणार आहेत. म्हणूनच संशोधकाने या विषयावर संशोधन करण्याचा प्रयत्न केला आहे.

***समस्या विधान :***

" शिक्षक शिक्षण पदविका ( डी.टी.एड.) अभ्यासक्रमातील अपंगांचे शिक्षण या घटकावर आधारित अनुदेशन संचाचे विकसन– एक अभ्यास. "

***पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या :***

I. शिक्षक शिक्षण पदविका

संकल्पनात्मक व्याख्या

" प्राथमिक शिक्षक होण्यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक शिक्षण संशोधन परिषदेने जो द्वीवर्षी आराखडा तयार केला आहे. त्याला शिक्षक शिक्षण पदविका म्हणतात."

– सोहनी श. क.

***कार्यात्मक व्याख्या :***

प्रस्तूत संशोधनामध्ये कोल्हापूर जिल्हयामध्ये असलेल्या डी.टी.एड. विद्यालयांचा समावेश केला गेला आहे.

Title :शिक्षक शिक्षण पदविका ( डी.टी.एड.) अभ्यासक्रमातील अपंगांचे शिक्षण सद्यस्थिती– एक अभ्यास
Source:Golden Research Thoughts [2231-5063] महेश अनंतराव शिंदे , प्रतिभा सुभाषचंद्र पाटणकरyr:2013 vol:2 iss:11

II.अभ्यासक्रम :

संकल्पनात्मक व्याख्या

"अभ्यासक्रम म्हणजे फक्त पुस्तकी ज्ञान देणारे व रुढ पध्दतीने शिकविले जाणारे विषय नव्हेत तर शाळेत मिळणा–या सर्व प्रकारच्या अनुभवांचा त्यात अंतर्भाव केलेला असतो."

– मुदलियार आयोग

***कार्यात्मक व्याख्या***

प्रस्तुत संशोधनामध्ये डी.टी.एड. अभ्यासक्रमातील द्वितीय वर्षामध्ये असणा–या पेपर क्रमांक एक प्राथमिक शिक्षण सद्यस्थिती, समस्या व उपाय यामधील अपंगांचे शिक्षण या घटकाचा समावेश केला गेला आहे.

III.अपंगाचे शिक्षण

संकल्पनात्मक व्याख्या

दृष्टीदोष, कर्णदोष, मतिमंद, अस्थिव्यंग व इतर अपंग व्यक्तींसाठी असलेले शिक्षण म्हणजे अपंगाचे शिक्षण होय.

***कार्यात्मक व्याख्या***

प्रस्तूत संशोधनामध्ये दृष्टीदोष, मुकबधिर, कर्णबधिर, मतिमंद, अस्थिव्यंग, अध्ययन अक्षम या घटकांचा अपंगांचे शिक्षण यामध्ये समावेश केला गेला आहे.

***संषोधनाची उद्‌दीष्टे :***

1.शिक्षक शिक्षण पदविका स्तरावरील अपंगांचे शिक्षण याविशयीच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
2.डी.टी.एड. छात्राध्यापकांचे अपंगांचे शिक्षण याबाबत असणा–या मतांचा शोध घेणे.
3.डी.टी.एड. शिक्षक प्रशिक्षकांचे अपंगाचे शिक्षण याबाबत असणा–या मतांचा शोध घेणे.

***संषोधनाची गुहितके :***

अध्यापक पदविका अभ्यासक्रमात अपंगांचे शिक्षण या घटकाचा समावेश आहे.

***संषोधनाची व्याप्ती :***

अध्यापक विद्यालयामधील छात्राध्यापकांना निष्कर्ष लागू होतात.

***संषोधनाची परिमर्यादा :***

प्रस्तूत संशोधन हे 2010–2011 सालापुरते मर्यादित आहे.

***संषोधनाचे महत्व :***

1.शिक्षक प्रशिक्षकांच्या दृष्टीने

i.समाजामध्ये असणा–या अपंग व्यक्तींबाबत असणारा दृष्टीकोन सकारात्मक होईल.
ii.अपंग व्यक्ती, त्यांचे प्रकार याची माहिती होईल.
iii.अपंग व्यक्ती, त्यांच्या समस्या, त्याची कारणे इ. बाबींची माहिती होईल.

2.छात्राध्यापकांच्या दृष्टीने

i.स्माजामध्ये असणा–या अपंग व्यक्तींबाबत असणारा दृष्टीकोन सकारात्मक होईल.
ii.अपंग व्यक्ती, त्यांचे प्रकार याची माहिती होईल.
iii.अपंग व्यक्ती, त्यांच्या समस्या, त्याची कारणे इ. बाबींची माहिती होईल.
iv.प्रस्तूत संशोधनाची कार्यपध्दती :

1.संशोधन पध्दती :
प्रत्सूत संशोधनामध्ये छात्राध्यापक व शिक्षक प्रशिक्षक यांच्या मतांचा अभ्यास करण्यासाठी शालेय सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

2.नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने छात्राध्यापकांची नमुना निवड करतांना सुगम यादृच्छिक पध्दतीने नमुना निवड केली आहे. शिक्षक प्रशिक्षकांची नमुना निवड करताना सहेतुक नमुना निवड केली आहे.

3.माहिती संकनाचे साधन :
माहिती संकलनासाठी मतावली, पडताळा सूची या संशोधन साधनांचा वापर केला आहे.

4.संख्याशास्त्र :
संकलित माहितीचे विश्लेशण करण्यासाठी शेकडेवारी, या सांख्यिकीय तंत्राचा वापर केला आहे.

***संशोधनाचे निष्कर्ष :***

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

1.शिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रमामध्ये अपंगांचे शिक्षण या घटकाला विशेष महत्व दिले गेले नाही. पदविकेच्या द्वितीय वर्षातील पेपर क्रमांक 1 प्राथमिक शिक्षण : सद्यस्थिती, समस्या व उपाय यामध्ये घटक क्रमांक 3 प्राथमिक शिक्षणाच्या विस्ताराची कारणे व समस्या या घटकामध्ये समावेश केला आहे. तसेच या घटकाच्या संदर्भात प्रात्यक्षिक कार्याचा समावेश केलेला नाही.

2.अपंग व्यक्तींना त्यांच्या गरजानुरुप, व्यावसायिक शिक्षण असावे. अपंगांच्या शिक्षणामध्ये त्यांच्या भविष्यकालीन स्थितीचा विचार करावा. पालक आपल्या अपंग बालकांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करतात. अपंगांच्या शिक्षणासाठी सामाजिक स्त्रोत, शैक्षणिक साधने यांचा वापर करावा. नवीन अध्यापन पध्दती, स्वयं अध्ययन संचाचा वापर करावा. नेहमीपेक्षा वेगळे मूल्यमापन तंत्र असावे असे बहुतांशी छात्राध्यापकांचे मत आहे.

3.अपंग व्यक्तींना शिक्षण मिळावे म्हणून वेगळे कायदे असावेत तसेच अपंगांच्या शिक्षणामुळे त्यांना शिक्षणाचा हक्क मिळाला आहे. लोकशाहीचे बळकटीकरण होवून त्यांचे सामाजिकीकरण होणार आहे. तसेच विविध मानवी, लोकशाही मूल्ये विकसित होणार आहेत असे बहुतांशी छात्राध्यापकांचे मत आहे. शिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रमामध्ये अपंगांचं शिक्षण या घटकामध्ये आणखीन आशयाचा समावेश करावा. यामध्ये अपंगांचे प्रकार, त्यांची वैशिष्टये, पूनर्वसन कार्यक्रम यांचा समावेश करावा. सध्याच्या अभ्यासक्रमातून पुरेसे प्रशिक्षण मिळत नाही असे बहुतांशी छात्राध्यापकांचे मत आहे.

4.अपंग व्यक्तींना त्यांच्या गरजानुरुप व्यावसायिक शिक्षण असावे. अपंगांच्या शिक्षणामध्ये त्यांच्या भविष्यकालीन स्थितीचा विचार करावा. पालक आपल्या अपंग बालकांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करतात असे बहुतांशी शिक्षक प्रशिक्षकांचे मत आहे. अपंगांच्या शिक्षणासाठी विविध सामाजिक स्त्रोतांचा शैक्षणिक साधनांचा वापर करावा. नवीन अध्यापन पध्दती, कार्यनिती, स्वयंअध्ययन संचाचा वापर करावा तसेच मूल्यमापन तंत्रामध्ये बदल करावा असे बहुतांशी शिक्षक प्रशिक्षकांचे मत आहे.

5.अपंगांच्या सामाजिकीकरणासाठी स्नेहसंमेलन, सर्व समावेशक शिक्षण उपयुक्त आहे. अपंगांच्या शिक्षणातून लोकशाहीतून बळकटीकरण होवून मानवी, सामाजिक व लोकशाही मूल्ये विकसित होणार आहे असे बहुतांशी शिक्षक प्रशिकांचे मत आहे. अपंग व्यक्तींना शिकविण्यासाठी प्रशिक्षणामध्ये बदल होणे गरजेचे आहे. शिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रमामध्ये अपंगांचे शिक्षण या घटकामध्ये आणखीन आशय असावा. त्यामध्ये अपंगांचे प्रकार, त्यांची वैशिष्टये, तयांचे मानसशास्त्र इत्यादींचा समावेश असावा.

***शिफारशी :***

1.महाराष्ट्र शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद :
iअपंगांच्या शिक्षणासाठी शिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रमामध्ये प्रात्यक्षिक व विविध उपक्रमांचा प्रत्यक्ष भेटींचा समावेश करावा.
iiशिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रमामध्ये विविध अध्यापन पध्दती, कार्यनिती, तंत्रे वापरण्यासाठीचे प्रशिक्षण असावे.

2.अध्यापक विद्यालय :
iअपंगांच्या शिक्षणाविशी छात्राध्यापकांना सर्वकश माहिती द्यावी.
ii सैधांतिक भागापेक्षा प्रात्यक्षिक भागाला जास्त महत्व द्यावे.
iiiछात्राध्यापकांना प्रशिक्षण देताना अपंगांच्या प्रकारानुसार असलेल्या विशेष शाळांच्या भेटींचे आयोजन करावे.
ivअपंगांसाठी असलेल्या शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अपंग व्यक्ती, त्यांचे पालक, शिक्षक इ. साठी कृतिसत्र, कार्यशाळा, शिबिरे आयोजित करावी.

***पुढील संशोधनासाठीचे विषय :***

1.अशाप्रकारचे संशोधन शिक्षक शिक्षणातील इतर स्तरांकरितासुध्दा करता येईल.
2.शिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रमातील इतर घटकांच्या बाबतीतसुध्दा असेच संशोधन करता येईल.

***संदर्भसूची :***

अडमुठे, रुपाली (जून 2003) बी.एड. अभ्यासक्रमातील शैक्षणिक मानसशास्त्र या विषयातील एका घटकावर आधारित संगणक सॉप्टवेअरचे विकसन. अप्रकाशित एम.फिल., शोधनिबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. इनामदार, इरफान ( 2006) विद्यार्थी शिक्षकासाठी भूगोलाच्या आशय समृध्दी संचाचे विकसन–एक अभ्यास.

अप्रकाशित पी.एच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
पंडित, बन्सी ( 2008) शिक्षणातील संशोधन, पुणेः नित्यनुतन प्रकाशन.
पाटील, वा.भा. ( 2006), संशोधन पध्दती, पुणे : प्रशांत पब्लिकेशन.
पांडव, प्रमोद ( एप्रिल 2008) अंशतः अंधांसाठी गुणवत्ता शिक्षण, शिक्षण संक्रमण पृष्ठ क्र. 25–30
भावे बी. एस. ( 2002) गणित परिणामकारक अध्यापनासाठी पारंपारिक पध्दती व संगणक सहायित अनुदेशन पध्दती यांचा तुलनात्मक अभ्यास. अप्रकाशित पी.एच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यपीठ, कोल्हापूर.
भिंताडे वि. रा. ( 2008) शैक्षणिक संशोधन पुणे : नुतन प्रकाशन.
शिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रम ( 2005), पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद?
वाघ एस.के. ( 1991) इयत्ता आठवीमधील विद्यार्थ्यांसाठी दशांश अपूर्णांकांवर आधारित उपचारात्मक अध्यापनासाठी बहुमाध्यमी अनुदेशन प्रणाली विकसित करणे. अप्रकाशित पी.एच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
वास्कर, पुष्पा आणि आंबेकर, एकनाथ ( सप्टेंबर 2010) संगणक सहायित भाषा. शिक्षण पृष्ठ क्र. 60–67
Best, John and kahn, James (2009) Research in Education, New Delhi.: PHI Learning Pvt. Ltd.m Gujjar and Malik (Jan. 2007) Instructional Material in distance Education. Turkish on-line Journal of distance education.
Ingale, S.M. (2005) Preparation of an enriched teaching package in economics for student teachers, unpublished M.Phill. Dessertation, Shivaji University Kolhapur.
Logan, Robert (1979) A state of the Art Assessment of Instructional Systems development. In Harord, Fo'nell(Eds) issues in Instructional Systems development. New York: Academic press, INC
Mchite, Prerana(1989) Developing and implementing a classroom instructional programme for children with learning difficulties. Unpublished thesis, S.M. University Borods.
Pawar, V.S. (May 1993) Entitled " Evaluation and Modification of prepared self instructional material of the distance education B.Ed. course of Shivaji University. Unpublished M.Phill. Desseration, Shivaji University Kolhapur. "
Rao, D., Prakash, Reddy B. (May 2002) Self learning through programmed learning in distance mode, India jou4nal of open learning VOL. II No. 2.
Rath S. (1991) An individualized instruction training approach for teaching children with learning difficulties in reading and comprehension skill.
Reddt and Kusuma (2000), Education of children with special needs, New Delhi : Discovery Publication house.
Sharma, Premlata & Pandey, Savitha (1992), An experimental study to assets the effectiveness of adapted instructional material in science on hearing impaired from IED and special schools.
Vanja, M. and Rajsekar, S. (2007), Educational Technology and Computer Education, Hyderabad : Neelkamal Publications Pvt. Ltd.

**From Internet :**

Marget B(March 1996) Instructional Material Development, A Review of the Instructional Material Development programme past, presentand future. National science foundation.
Retrieved on November 18, 2010 from://tech.terc.edu/papers/papers/cozzens. htm//math % 20imd
Instructional Design Model (1980) ADDIE Model, retrieved on December 20,2010.
Htt://www.google.co.in/search?hl=en&source=hp&q=instructional+design+model%5education & btnG=google+search&meta
Disk and Carry (1878) The systematic Design of instruction. Retrieved December 20,2010.
http://www.slideswhow.net/akteachee/dick-carryinstruction-design.
Harold, Fonelt(1979) Issues in instructional system development Retrieved December 20,2010
http://www.slideshow.net/akteachee/dick-carryinstruction-design.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net